## १५ कुष्ठरोगाचे मुख्य प्रकार : तुलना

(राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम)

| कुष्ठरोग (असांसर्गिक) | कुष्ठरोग (सांसर्गिक) |
|---|---|
| १. चट्टे संख्येने कमी असतात. | १. चट्टे संख्येने जास्त असतात |
| २. चट्टे बधीर, जाड असतात. | २. चट्टे सपाट, पांढरट, तेलकट किंवा लालसर असतात. सुरुवातीच्या काळात बधीर नसतात. |
| ३. हातापायांना बधिरता, विकृती लवकर येतात. | ३. हातापायांना बधिरता, विकृती काही वर्षानंतर येते. |
| ४. चट्टे कोठे सुरु होतात व कोठे संपतात हे कळते.(आखीवपणा असतो) | ४. चट्टा कोठे सुरु होतो व कोठे संपतो हे कळणे अवघड असते. |
| ५. त्वचेच्या नमुन्याची सूक्ष्मदर्शकाखाली त्वचेची तपासणी केली तर जंतू सापडत नाहीत. | ५. त्वचेचा नमुना सूक्ष्मदर्शकाने तपासला तर कुष्ठरोगाचे जंतू आढळतात |
| ६. योग्य उपचाराने लवकर बरा होतो. | ६. उपचार जास्त काळ करावे लागतात |
| ७. प्रतिकारशक्ती, तुलनेने जास्त, त्यामुळे लवकर बरा होतो. | ७. अतिशय कमी प्रतिकारशक्ती, उपचारास जास्त वेळ लागतो. |